# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 18.12.2024** **वार – बुधवार**

---

**ऊस गाळप**

राज्यात आतापर्यंत 206 लाख मेट्रिक टन उसाचं गाळप झालं असून सर्वाधिक गाळप पुणे विभागात झालं आहे. साखर आयुक्तांच्या आदेशानुसार जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांनी 15 डिसेंबरपर्यंत ऊस दर जाहीर करणं अपेक्षित होतं. जिल्ह्यातील चार ते पाच कारखाने वगळता इतर साधारण 30 साखर कारखान्यांनी अद्यापही उसाचा दर जाहीर केलेला नाही.

**ससून**

पुण्यासाठी ससून रुग्णालयात मुख्यमंत्री सहाय्यता निधीचं मध्यवर्ती मदत आणि मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात यावं अशी मागणी आमदार सुनिल कांबळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडं केली आहे. ससून सर्वोपचार रुग्णालयात असंख्य गोरगरीब रुग्ण महाराष्ट्रभरातून दाखल होत असतात, तसंच निधीच्या नमुन्यावर सहीसाठी रांग लागते याकडं कांबळे यांनी लक्ष वेधलं आहे.

**प्लास्टीक**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि औद्योगिक संस्थेच्या सहकार्यानं शहरात सहा प्रमुख ठिकाणी प्रगत प्लास्टिक पुनर्वापर यंत्रं बसवण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. यामुळं नागरिकांना प्लास्टिकच्या बाटल्या जबाबदारीनं योग्य ठिकाणी टाकण्याची सोय मिळेल. त्यापासून सेफ्टी जॅकेट्स, टाईल्स, पेन आणि बेंचसारख्या उपयुक्त वस्तू बनविता येतील.

**स्थायी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत विविध विकासकामांच्या खर्चाला मंजुरी देण्यात आली. चिखली इथं आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी गृहप्रकल्पांमध्ये व्यापारी गाळे बांधण्यासाठी सल्लागार नेमण्यास या बैठकीत प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली आहे.

**पुल**

साधू वासवानी उड्डाणपुलाचा उर्वरित भाग पाडण्याचं काम पुढील आठवड्यात सुरू करण्यात येणार आहे. पुणे स्टेशनजवळ, कोरेगाव पार्क भागात साधु वासवानी रेल्वे उड्डाणपुल बांधून 50 वर्षांपेक्षा अधिक काळ लोटला असल्यानं तो वाहतुकीसाठी धोकादायक झाला आहे. या पुलाच्या कामासाठी सुमारे 83 कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

**लासुर्णे-पुल**

पालखी महामार्गावर इंदापूर तालुक्यातील लासुर्णे इथल्या प्रस्तावित उड्डाणपुलास स्थानिक गावकऱ्यांचा विरोध असून ग्रामपंचायतीनं तसा ठराव देखील केला आहे. याठिकाणी असलेल्या जोड रस्त्यांचा पर्याप्त वापर योग्य रीतीनं होत असल्यानं उड्डाणपुलाबाबत फेरविचार व्हावा, अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी केंद्रीय रस्ते वाहतुक मंत्री नितीन

गडकरी यांना पत्राद्वारे केली आहे. स्थानिक नागरिकांच्या मते याठिकाणी उड्डाणपूल उभारल्यास तोटाच होण्याची शक्यता असल्याचं सुळे यांनी पत्रात म्हटलं आहे.

**मोर्चा**

पुण्यातील महिला जागर समितीच्या वतीनं महिला सक्षमीकरणासाठी जागर मोर्चाचं आयोजन करण्यात आलं होतं. महिला सक्षमीकरणावर, आणि अत्याचारांच्या विरोधात महिलांनी घोषणा दिल्या, गाणी, कविता सादर केल्या. अत्याचाराच्या विरोधात उभं राहण्याची प्रतिज्ञा घेण्यात आली.

**केन-झुकरमन**

अभिजात भारतीय शास्त्रीय संगीत केवळ नोटेशन पाहून नाही तर एकाग्र चित्तानं ऐकून त्यात स्वत:च्या कल्पकतेची भर घालत आत्मसात केलं जातं हा विचार माझ्यातील कलाकाराला भावला अशी भावना स्वित्झर्लंडचे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे सरोद वादक, केन झुकरमन यांनी पुण्यात व्यक्त केली. ऋत्विक फाऊंडेशन आणि मॉर्डन कला महाविद्यालयाद्वारे आयोजित मैफिलीत केन झुकरमन बोलत होते. याप्रसंगी झुकरमन यांचं सरोद वादन आणि त्यांच्या सांगीतिक क्षेत्राविषयीचे अनुभव त्यांनी श्रोत्यांना सांगितले. वारशातून मिळालेलं भारतीय शास्त्रीय संगीत आपण शिकवत राहणार आहे, असंही त्यांनी आवजूर्न सांगितलं.

**अभिवाचन**

शब्दप्रभू ग. दि. माडगूळकर यांच्याद्वारे लिखित 'संगीत युद्धाच्या सावल्या' या नाटकातील ग्रामीण भाषेचं सौंदर्य दाखवत त्यातील गोडवा अन् डौल, वेगवेगळ्या पदांमधून आणि अभिवाचनातून पुणेकर रसिकांना अनुभवायला मिळाला. 'संगीत युद्धाच्या सावल्या' या नाटकाच्या पहिल्या प्रयोगाला 80 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्तानं गंधर्वभूषण जयराम शिलेदार संगीत नाट्य सेवा ट्रस्टतर्फे सांगीतिक नाट्यवाचनाचं पुण्यात आयोजन करण्यात आलं होतं. स्वातंत्र्यपूर्व काळातील संगीत नाटकांच्या दरबारामध्ये ग. दि. माडगूळकर यांनी साकारलेल्या या नाटकानं स्वत:चं वेगळेपण जपलं आहे. यातील नाट्यपदं, संवाद वेगळ्या धाटणीचं असून त्या काळातील सामाजिक परिस्थितीवर भाष्य करणारे आहेत.

**गौरव**

भारतीय टपाल विभागाच्या पुणे क्षेत्रीय कार्यालयानं खेळाडू वृत्तीला वाव देण्यासाठी आणि खेळांच्या माध्यमातून शरीर आणि मानसिक आरोग्य सुधारण्याच्या उद्देशानं  खेळाडूंचा सत्कार केला आणि त्यांना प्रोत्साहन दिलं. पुणे क्षेत्रीय कार्यालयाद्वारा आयोजित एका विशेष कार्यक्रमात, कुस्ती आणि सुमो कुस्ती खेळांमध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या मनाली जाधव आणि सोनाली तोडकर यांचा सत्कार करण्यात आला. मनाली जाधव पुणे जी पी ओ कार्यालयात बहुकार्य कर्मचारी म्हणून कार्यरत असून सोनाली तोडकर टपाल सहाय्यक पदावर कार्यरत आहेत.

**हवामान**

पुण्यात थंडीचा कडाका सुरुच आहे. आजप्रमाणे उद्याही किमान तापमान 9 अंश सेल्सियस राहील. कमाल तापमानात मात्र वाढ होऊन ते 30 अंशांवर जाण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**